नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 07/08/2020 (शुक्रवार)
(सायंकाळ)

---

## अवैधरित्या घरगुती वापरातील सिलेंडर ची साठेबाजी करून काळाबाजारी करणाऱ्यांवर धाड दोन ठिकाणी स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई 4 आरोपींसह एकुण 10,16,540/-रू चा माल जप्त

दिनांक 06.08.2020 रोजी मिळालेल्या गुप्त माहीतीनुसार पोस्टे वेलतुर अंतर्गत पचखेडी या गावात दोन ठिकाणी काही ईसम आपले राहते घरात व दुकानात कोणताही कायदेशीर परवाना नसतांना अवैध्यरित्या घरगूती वापराचे गॅस सिलेंडरचा साठा करून तसेच अवैध्यरित्या गॅस सिलेंडरची वाढीव दरात लोकांना विक्री करून मानवी जिवनास अत्यावश्यक असलेल्या जिवनावश्यक गॅस सिलेंडरचा काळाबाजार करीत आहे. अशी माहीती मिळताच स्थानीक गून्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार हे आपले पथक घेवुन पचखेडी येथे रवाना झाले. पुरवठा निरीक्षक तहसील कार्यालय कुही यांना पाचारण करून पंचासमक्ष सदर दोन्ही ठिकाणी धाडी टाकली असता दोन वेगवेगळया ठिकाणी अवैधरीत्या काळाबाजार करण्यासाठी साठवुन ठेवलेला घरगूती वापराचे गॅस सिलेंडरचा मोठया प्रमाणात साठा मिळुन आला. मिळुन आलेला मूद्देमाल जप्त करून आरोपीविरूध्द पोस्टे वेलतुर येथे अत्यावश्यक वस्तु अधिनियम अंतर्गत दोन वेगवेगळे गून्हे नोंद करण्यात आले.

ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे :-

1) खूशाल गोदरूजी ठवकर वय 40 वर्ष रा.नवेगाव (देवी)ता.कुही जि.नागपूर
2) सोपान सूरेश बोदरे वय 25 वर्ष रा. माजरी ता कूही जि.नागपूर
3) ताराचंद हरीचंद ठाकरे वय 50 वर्ष रा. वार्ड क्र 01 पचखेडी ता कूही जि नागपूर
4) गोपीचंद गूलाबराव देशमूख वय 35 वर्ष रा. वार्ड क्र 16 कूही जि.नागपूर

जप्त करण्यात आलेला मुद्देमाल :-

1) 63 नग भरलेले घरगूती वापराचे गॅस सिलेंडर किं. 1,57,500/- रू.
2) 25 नग रिकामे घरगूती वापराचे गॅस सिलेंडर किं. 45,000/- रू.
3) सूझुकी कंपनीचा पिकअप वाहन क्र एमएच-40 बीजी-8656 कि 4,00,000/- रू
4) सूपर कॅरी मारोती कंपनीचा पिकअप वाहन क्र एमएच-40बीएल-1676 कि. 4,00,000/- रू
5) एचपी गॅस घरेलु गॅस उपभोक्ता कार्ड, 17 नग लायटर, रेग्यूलेटर, गॅस पाईप, 2 नग मोबाईल असा
   एकुण 10,16,540/-चा माल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई नागपूर ग्रमीण जिल्हयाचे पोलीस अधिक्षक श्री राकेश ओला, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राउत यांचे मार्गदर्शनाखाली स्थानीक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार, सहा पोलीस निरीक्षक जितेंद्र वैरागडे, पोलीस हवालदार संतोष पंधरे, मदन आसतकर, पोलीस शिपाई राधेश्याम कांबळे, बालाजी साखरे, महीला पोलीस नाईक कविता साखरे व चालक पोलीस हवालदार भाउराव खंडाते तसेच पुरवठा निरीक्षक मोनिका गजभीये तहसील कार्यालय कुही यांचे पथकाने पुर्ण केली आहे.



## खून

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 500 मी. अंतरावर बुटीबोरी ते चंद्रपुर रोड लगत, केजीएन चिकंन सेंटर समोर दिनांक 06/08/2020 चे 18.45 वा. दरम्यान जखमी फिर्यादी नामे– प्रित फॅन्की पॉल, वय 19 वर्ष, रा. नाराघाट जरीपटका पो. स्टे. चे मागे धम्मयान नगर प्लॉट क्र. 27, नागपुर याचा मित्र पवन कौरते याचे वाढदिवसाचे पार्टी निमित्य त्याचे मित्र नामे– 1) इलीयास जोसेफ लुईस(मृतक), वय 25 वर्ष, रा. ठाणापादरी ता. उमरेड जि. नागपुर, 2) बादल मधुराप्रसाद अमुले(मृतक), वय 19 वर्ष, रा. धम्मयान नगर प्लॉट क्र. 95 येथे किरायने मुळ रा. नादीरसोला ता. कटंगी जि. बालाघाट मध्यप्रदेश, रशीद, तुषार ढाकणे, पांडया, साजु उर्फ क्रिस्टोफर शिमोन फ्रान्सीस उरकुडे(जखमी), मिकेल, सोलोमन असे एकत्र मिळुन वाढदिवसाची पार्टी केली. त्यानंतर फिर्यादी व त्याचे मित्र रशीद, तुषार ढाकणे, पांडया, साजु उर्फ क्रिस्टोफर, असे मिळुन एकत्र साय 6:45 वा. दरम्यान एमआयडीसी बुटीबोरी चौकातील रशीद चें फिशफ्राय दुकानाकडे गेले आणि तेथे बोलत उभे असंताना आरोपी नामे– सादाब उर्फ मुन्ना हनिफ खान, वय 19 वर्ष, रा. बुटीबोरी हा फिर्यादी जवळ गेला असता फिर्यादीने आरोपी याला म्हटले की, ''तु मला ओळखतो काय'' असे बोलला तेव्हा आरोपी मुन्ना हनिफ शेख याने फिर्यादीला शिविगाळ केल्याने फिर्यादीचा मित्र इलीयास व फिर्यादीने आरोपी मुन्ना हनिफ शेख याला एक एक थापड मारल्याने त्याने त्याचे सोबत असलेले मित्र आरोपी 1) एजाज गुलाम शेख वय 31 वर्ष 2) जावेद जब्बार शेख वय अंदाज 22 वर्ष 3) अरबाज जब्बार शेख वय अंदाजे 20 वर्ष 4) समीर गुलाम शेख वय 36 वर्ष 5) दिक्षांत पाटील वय अंदाजे 20 वर्ष 6) सादाब उर्फ मुन्ना हनिफ खान वय 19 वर्ष 7) ऐजाज उर्फ अंडा रहीम शेख वय अंदाजे 30 वर्ष 8) फिरोज गुलाम शेख वय अंदाजे 38 वर्ष 9) शुभम शंकर वानखेडे वय 21 वर्ष 10) साजीद कासीम शेख वय 21 वर्ष सर्व राहणार बुटीबोरी 11) टिकेश उर्फ गोलु शिवदास शाहु वय अंदाजे 21 वर्ष रा.टाकळघाट 12) फैज अलम शेख रा.वटेघाट वय अंदाजे 22 वर्ष 13) सोहेल शेख जुनीवस्ती बुटीबोरी वय अंदाजे 25 वर्ष 14) टिन्या उर्फ अर्पीत रामदास किटे रा. बुटीबोरी वय अंदाजे 23 वर्ष यांना बोलावुन गैरकायदयाची मंडळी गोळा करून त्यांनी चाकु हत्यारासह फिर्यादी व त्याचे मित्राजवळ येवुन फिर्यादीस दगडाने व त्याचे मित्र इलीयास लुईस, बादल अमुले, क्रिस्टोफर उर्फ साजु यांना चाकुने मारून फिर्यादीचा मित्र बादल यास जिवानिशी ठार मारले. तसेच इलीयास, क्रिस्टोफर उर्फ साजु यांना जिवानिशी ठार मारण्याचे उद्देशाने त्याला चाकुने मारून गंभीर जखमी केले. इलीयास हा उपचारा दरम्यान मेडीकल हॉस्पीटल नागपुर येथे मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे बोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम 302, 307, 326, 324, 143, 147, 148, 149, 504 भादवी सहकलम 4/25 भारतीय हत्यार कायदा सहकलम 3(2)(व्ही) आर ड अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. 1989. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी नामे क्र. 1) एजाज गुलाम शेख वय 31 वर्ष, 2) समीर गुलाम शेख वय 36 वर्ष, 3) साजीद कासम शेख वय 21 वर्ष 4) सादाब उर्फ मुन्ना हनिफ खान वय 19 वर्ष व 5) शुभम शंकर वानखेडे वय 21 वर्ष सर्व राहणार बुटीबोरी यांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी श्री राजेन्द्र चव्हाण नागपूर विभाग नागपूर हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर